पोषण बाग: आर्थिक समृद्धी आणि आरोग्याचा मार्ग

Access Agriculture

आंध्र प्रदेश राज्यातील वीरभद्रपुरम गावातील जानकी बोबिली या पोषण-बाग उपक्रमाच्या एक प्रमुख आणि प्रेरणादायी कार्यकर्त्या म्हणून पुढे आल्या आहेत. हा उपक्रम केवळ शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देत नाही, तर तो विविध हंगामांनुसार आणि ऋतूंशी सुसंगत अशा वैविध्यपूर्ण व पौष्टिक अन्नधान्याची उपलब्धता वाढवून ग्रामीण कुटुंबांच्या आरोग्य आणि कल्याणात ठळक सकारात्मक बदल घडवून आणतो. ग्रामीण भागात या उपक्रमामुळे एक बदलाची लाट निर्माण झाली असून, विशेषतः महिला सक्षमीकरणाच्या दिशेने तो उपक्रम एक प्रभावी आणि आशादायक पाऊल ठरला आहे.

ग्रामीण भारतात अन्नसुरक्षेमध्ये काही प्रमाणात सुधारणा झालेली असली तरी कुपोषणाचे, विशेषतः सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेचे, आव्हान अजूनही टिकून आहे. ही बाब लक्षात घेऊन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने २०२१ मध्ये पोषण-बाग उपक्रमाची सुरुवात केली. 'तुम्ही जे खाल, तेच पिकवा आणि जे पिकवाल, तेच खा' या विचारधारेवर आधारलेला हा उपक्रम, सुव्यवस्थित पोषण बागांच्या माध्यमातून पौष्टिकतेचा प्रसार करण्यावर भर देतो. या उपक्रमांतर्गत रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वापर टाळून स्थानिक भाज्या, फळे, औषधी वनस्पती आणि मसाले पिकवण्यास प्रोत्साहन दिले जाते. यासोबतच स्वयंपाकघरातील उरलेला जैवकचरा वापरून सेंद्रिय खत तयार करण्याची पद्धत अंगीकारण्यावरही भर दिला जातो. अशा प्रकारे हा उपक्रम केवळ आरोग्यदायी अन्नपुरवठा सुनिश्चित करत नाही, तर कृषी जैवविविधतेच्या संवर्धनास हातभार लावतो आणि पाण्याच्या वापरामध्ये बचत होण्यासही मदत करतो.

तथापि, भारतातील विविध भौगोलिक परिस्थिती आणि पारंपरिक शेतीच्या पद्धतीमुळे पोषण-बाग उपक्रम राबविण्याच्या पद्धतीत संपूर्ण देशभर लक्षणीय विविधता दिसून येते. उदाहरणार्थ, निसर्गपूरक शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या आंध्र प्रदेशमधील APCNF (आंध्र प्रदेश कम्युनिटी मॅनेज्ड नॅचरल फार्मिंग) या उपक्रमाअंतर्गत त्यांनी ATM (एनी टाइम मनी) या अनोख्या मॉडेलच्या माध्यमातून पोषण-बाग उपक्रमाची अंमलबजावणी सुरू केली आहे.

ATM मॉडेलचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील तरुण आणि तरुणींना शेतीकडे वळवण्याचा असून, त्यासाठी नैसर्गिक शेतीच्या पद्धती वापरून एका ठिकाणी विविध पिकांचे रिले पीक मॉडेल उभारण्यावर भर दिला जातो. या मॉडेलमध्ये बियाणे पेरल्यानंतर अगदी अल्प कालावधीत उत्पन्न मिळायला सुरुवात होते, आणि संपूर्ण हंगामभर वेगवेगळ्या टप्प्यांवर पिकांचे उत्पादन घेतले जाते, ज्यामुळे उत्पन्नाचा एक सातत्यपूर्ण प्रवाह निर्माण होतो.

'तरुण महिलांनी त्यांची पोषण-बाग तयार करण्यापूर्वी, आम्ही त्यांना प्रत्येक टप्प्यावर योग्य ते मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देतो,' असे ATM मॉडेलच्या अंतर्गत जनजागृती मोहिमा व प्रशिक्षण सत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होणाऱ्या जानकी यांनी सांगितले.

जानकी ही शेतकरी कुटुंबातून येत असल्याने ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांपुढे उभ्या राहणाऱ्या विविध अडचणी आणि आव्हानांची तिला खोलवर जाणीव आहे. रसायनशास्त्र विषयात पदवी मिळवल्यानंतर आणि शेतीसंबंधित तंत्रज्ञान समजून घेण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे तिने स्थानिक 'सबाला' या स्वयंसेवी संस्थेच्या उपजीविका उपक्रम विकास कार्यक्रमात सक्रिय सहभाग घ्यायला सुरुवात केली. त्यानंतर, २०१६ साली ती सबालाच्या कार्यात अधिकृतरीत्या सहभागी झाली आणि शेतकरी उत्पादक संघटनांच्या स्थापनेसह त्यांना प्रशिक्षण देण्याच्या जबाबदारीत स्वतःला झोकून दिले. आंध्र प्रदेश कम्युनिटी मॅनेज्ड नॅचरल फार्मिंग कार्यक्रमासाठी कार्यरत असलेल्या संसाधन संस्थांपैकी एक असलेल्या 'सबाला' या संस्थेचे काम नैसर्गिक शेती, सेंद्रिय उत्पादन, आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या असुरक्षित महिलांच्या सक्षमीकरणावर केंद्रित आहे.

'सबाला' संस्था जैवविविधता मेळावे तसेच इतर उपक्रमांच्या माध्यमातून भरडधान्याच्या स्थानिक उत्पादनाला, वापराला आणि थेट खरेदीला प्रोत्साहन देते. भरडधान्य हे केवळ पोषणमूल्यांनी समृद्धच नसून, दुष्काळासही प्रतिकारक असणारे धान्य आहे. यामुळेच हे धान्य भारताच्या पारंपरिक अन्न संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग राहिले आहे. काही काळ दुर्लक्षित राहिल्यानंतर, भरडधान्याला आता हळूहळू पुन्हा मुख्य प्रवाहात स्थान मिळू लागले आहे. वर्ष २०२२ मध्ये, जानकीने जेव्हा ॲक्सेस ऑग्रीकल्चर यंग आंत्रप्रेन्योर चॅलेंज फंड या उपक्रमाविषयी आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांसाठी एक संधी उपलब्ध असल्याचे ऐकले, तेव्हा तिने आपल्या सहकारी श्यामला बोबिली आणि कोम्मू एस्वारा राव यांच्यासह अर्ज करण्याचा निर्णय घेतला. जानकी सांगतात, 'ग्रामीण महिलांमध्ये आणि स्थानिक आदिवासी तरुणांमध्ये नैसर्गिक शेती व कृषी जैवविविधतेविषयी जागरूकता वाढवणे हे 'सबाला' संस्थेचे कार्य आहे, आणि हाच उद्देश आम्हाला या उपक्रमासाठी अर्ज करायला प्रवृत्त करणारा ठरला.'

आंध्र प्रदेशातील 'आंत्रप्रेन्योर फॉर रूरल ॲक्सेस' (ERA) या उपक्रमासाठी तरुण ग्रामीण उद्योजकांच्या एका टीमचा भाग म्हणून तिच्या टीमची निवड झाल्याचे कळल्यावर जानकीला अतिशय आनंद झाला होता. या तीन दिवसांच्या प्रशिक्षण कार्यशाळेदरम्यान, त्यांच्या टीमला एक स्मार्ट प्रोजेक्टर देण्यात आला, ज्यामध्ये कृषी विषयक

प्रशिक्षणासाठी उपयुक्त अशा दर्जेदार व्हिडिओंचा समृद्ध संग्रह उपलब्ध होता. राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था (MANAGE) चे महासंचालक डॉ. पी. चंद्रशेखरा यांनी निवड झालेल्या ERA टीमना उद्देशून सांगितले, 'तुमच्या हातात दिलेला स्मार्ट प्रोजेक्टर ही एक जादूची पेटी आहे – एक अत्यंत प्रभावी साधन; आता तुम्ही सुपरहिरो आहात, कारण या साधनाच्या मदतीने तुम्ही शेतकऱ्यांना कृषी पर्यावरणशास्त्र आणि नैसर्गिक शेतीच्या फायद्यांचे प्रभावी सादरीकरण करू शकता.'

जानकी आणि तिच्या टीममधील सहकाऱ्यांना या विधानाचा अर्थ खऱ्या अर्थाने तेव्हाच उमगला, जेव्हा त्यांनी तेलुगू भाषेत तयार केलेले उच्च दर्जाचे प्रशिक्षण व्हिडिओ महिला शेतकरी आणि आदिवासी तरुणांपर्यंत पोहोचवले, आणि त्यांच्यात निर्माण झालेली जिज्ञासा आणि उमेद अनुभवली. ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकत, 'सबाला' संस्थेने ४० गावांतील सुमारे १,२०० महिला शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागातून 'मिलेट सिस्टर्स नेटवर्क' आणि 'आरोग्य मिलेट्स' या नावाने भरडधान्य प्रक्रिया केंद्र स्थापन केले आहे. या केंद्रामार्फत सदस्य महिलांना मूल्यवर्धित भरडधान्य उत्पादनांच्या निर्मितीसाठी आवश्यक ते प्रशिक्षण दिले जाते. 'स्मार्ट प्रोजेक्टर हे सर्व सदस्यांच्या कौशल्यविकासासाठी एक प्रभावी माध्यम ठरले आहे,' असे जानकी ठामपणे सांगते.

सबाला टीम अनेक गावांमध्ये मातीची सुपीकता, जलसंवर्धन, वनस्पतींचे आरोग्य आणि सेंद्रिय खतांचा वापर यासंबंधी सुधारित पद्धतींचा प्रसार करण्यासाठी शिक्षणात्मक व्हिडिओ दाखवते. या व्हिडिओंमध्ये धानाच्या पेंढ्यापासून कंपोस्ट खत तयार करणे, कोको पिटचा उपयोग, भाज्यांमध्ये आढळणाऱ्या मिलीबग्सचे व्यवस्थापन, धानाच्या पानांना गुंडाळणाऱ्या अळीचा मुकाबला करण्याच्या तंत्रांची माहिती आणि शरद ऋतूतील आर्मीवर्म्सचे नैसर्गिक नियंत्रण या विषयांचा समावेश असतो. एकात्मिक शेती आणि पोषणबाग यांना सबाला संस्थेच्या कामात विशेष महत्त्व असून, टीमने दाखवलेले इतर लोकप्रिय व्हिडिओ तुर पिकात मक्याची आंतरपीक पद्धत, सुधारित पद्धतीने पीक लागवड, भेंडी पिकाची निगा राखण्याच्या तंत्रांसह, दर्जेदार बियाण्यांची निवड, टोमॅटो रोपांची लावणी व देखभाल, तसेच ताजे व वाळवलेले टोमॅटो साठवण्याचे आणि मिरची वाळवणे व साठवण्याचे विविध उपाय दर्शवतात.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये अन्न धान्य उत्पादन व कृषी जैवविविधतेबद्दलची जाणीव निर्माण करण्यासाठी स्मार्ट प्रोजेक्टरचा प्रभावीपणे वापर केला जातो.


प्रत्येक व्हिडिओ प्रदर्शनानंतर, उपस्थित शेतकरी गटांमध्ये त्या पद्धती प्रत्यक्ष शेतात कशा राबवायच्या यावर सविस्तर चर्चा घडवून आणली जाते. सबाला ERA टीम स्मार्ट प्रोजेक्टरच्या साहाय्याने ATM (Any Time Money) मॉडेलबाबत जनजागृती करते. या मॉडेलमध्ये भाज्या, फुले, भरडधान्य, डाळी आणि तेलबिया यांचा समावेश असून, शेतकरी कोणती पिके घ्यावीत हे स्वयंपर निर्णय घेऊ शकतात. मात्र, ATM मॉडेलनुसार त्यांना प्रत्येक श्रेणीमधून किमान एक पीक निवडणे आवश्यक असते. वांगी, भेंडी, टमाटर, मिरची, कांदा, मुळे, गाजर, गोड बटाटे, वेगवेगळ्या प्रकारचे भोपळे, कढीपत्ता, धणे, पालक आणि मेथी यांसारख्या पालेभाज्यांचा समावेश असलेल्या विस्तृत पीक श्रेणीस शेतकऱ्यांना स्वीकारण्यास प्रोत्साहन दिले जाते. या मॉडेलअंतर्गत निवडलेली पिके अत्यंत उष्ण हवामानातसुद्धा टिकून राहत असल्यामुळे अन्नसुरक्षा अबाधित राहते.

'शेतकरी सहसा ही पिके साधारणतः ४०० चौरस मीटरच्या लहानशा जागेवर घेतात आणि वर्षभर त्यांची कापणी करता येते, त्यामुळे त्यांना दर आठवड्याला उत्पन्न मिळवण्याची संधी मिळते. बहुतांश वेळा शेतकरी त्यांचे उत्पादन स्थानिक बाजारात, म्हणजेच आपल्या गावातच विकतात; परंतु जेव्हा उत्पादन अपेक्षेपेक्षा जास्त होते, तेव्हा आम्ही त्यांना इतर जिल्ह्यांतील संभाव्य खरेदीदारांशी जोडण्याचे काम करतो,' असे सबाला टीम स्पष्ट करते.

कोटनुवरीपापेम गावातील महिला शेतकरी सप्पला प्रमीला हिने सबाला संस्थेच्या मार्गदर्शनाखाली ४,००० चौरस मीटर क्षेत्रात, ९,६०० रुपयांची गुंतवणूक करत



स्मार्ट प्रोजेक्टरद्वारे व्हिडिओ दाखवत व्यापक जनजागृती करतांना जानकी बोबिली



एटीएम मॉडेलची अंमलबजावणी केली. तिने १३ प्रकारच्या भाज्या, ३ प्रकारच्या शेंगा आणि झेंडूच्या फुलांचे उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमातून तिला दर आठवड्याला सरासरी ३,५०० रुपये उत्पन्न मिळू लागले. केवळ चार महिन्यांतच तिने ४५,००० रुपयांचे उत्पन्न मिळवले. याशिवाय, आता भाजीपाला खरेदी करण्याची गरजच उरलेली नसल्याने तिचा खर्चही कमी झाला आणि तिच्या कुटुंबाला रसायनमुक्त, घरच्या घरी पिकवलेला ताजा, पोषणमूल्यांनी समृद्ध आहार मिळू लागला.

अन्न उत्पादन आणि कृषी जैवविविधतेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने ERA टीम शाळांमध्ये भेटी देत असताना स्मार्ट प्रोजेक्टरचा प्रभावीपणे उपयोग करते. स्मार्ट प्रोजेक्टर मिळाल्यानंतरच्या केवळ एका वर्षात, जानकी आणि तिच्या सहकाऱ्यांनी सुमारे १,००० लोकांपर्यंत कृषी शिक्षणात्मक व्हिडिओ पोहोचवले, ज्यामध्ये ६८% महिला आणि ७८% तरुणांचा सहभाग होता. पोषण-बागांचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी म्हणून शेतकरी संघटनांच्या सदस्यांना प्रोत्साहित करताना, जानकी आणि तिची टीम त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित व्हिडिओ तर दाखवतातच, पण त्याबरोबरच APCNF कार्यक्रमामधून सादर करण्यात आलेल्या यशस्वी नैसर्गिक शेतीच्या केस स्टडीजही शेअर करतात. अशा उपक्रमांमधून पुढे सुरू होणाऱ्या चर्चासत्रांत, स्वतः एक नैसर्गिक शेती करणारी शेतकरी असलेल्या जानकीकडून इतर शेतकऱ्यांना नव्या शेती मॉडेलकडे वळण्यासाठी आत्मविश्वासाने प्रेरणा दिली जाते. तिच्या कार्यातील सातत्य, अनुभव आणि समर्पण पाहता, ऑगस्ट २०२३ मध्ये तिला APCNF मध्ये क्लस्टर कार्यकर्ता म्हणून सामील होण्याचे निमंत्रण मिळाले, आणि आजही ती तिथे नैसर्गिक शेतीसाठी कटिबद्ध आहे.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर अन्न-धान्य प्रणाली अधिक सशक्त आणि टिकाऊ बनवण्यासाठी एक समग्र आणि बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक ठरतो. याच दिशेने पाऊल टाकत, नैसर्गिक शेती व पोषण-बागांना चालना देण्याबरोबरच, सबाला संस्था भरडधान्याधारित अन्नपदार्थांच्या पोषणमूल्यांविषयी जागरूकता वाढवण्यासाठी स्मार्ट प्रोजेक्टरचा उपयोग करण्याचा विचार करत आहे. त्याचबरोबर, बाजरी, फणस, शेंगदाणे आणि हळदी यांसारख्या स्थानिक पिकांसाठी जैव-संसाधन केंद्रे आणि प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यासाठी व त्यांचा विस्तार घडवून आणण्यासाठीही या तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाणार आहे.

अधिक संपर्कासाठी सुश्री जानकी बोबिली यांच्याशी +९१ ९३४ ७३९ ९३६३ किंवा bobbilijanaki02@gmail.com या ईमेलद्वारे संपर्क साधता येईल.

Ms. Janaki Bobbili can be contacted at +91 934 739 93 63 or *bobbilijanaki02@gmail.com;*

Note: This case is originally published in Van Mele, P., Mohapatra, S., Tabet, L. and Flao, B. 2024. **Young changemakers: Scaling agroecology using video in Africa and India.,** Access Agriculture, Brussels, 175 pp.

मराठी अनुवाद : आनिकेत लिखार

Source :*Reaping health and welath benefits from nutri-garden, Leisa India, June 2024*